स.फौ.ख.क्र. 826/2026.
**सरकार वि.** अंकुश चव्हाण.
**निशाणी क्र.** 4

## आरोपी विरुध्दचा गुन्हयाचा सार

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | - | 13.11.2025 |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीची दिनांक | - | 13.11.2025 |
| ३. | फिर्याददारांचे नाव | - | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>गणेशपेठ---- पोलीस स्टेशन,<br>नागपूर. |
| ४. | आरोपीचे नाव व पत्ता | - | अंकुश बसराम चव्हाण<br>वय-32 वर्षे, धंदा- चालक.<br>रा. प्रजेती वार्ड क्र.२. मेर. खवलकाळे |

५. अपराधाचा तपशीलः ---------- वाहतुकीस अडथळा निर्माण करणे.

----------------------------------------त्यायोगे तुम्ही भारतीय न्याय संहीता २८५ या अंतर्गत शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आणि याद्वारे मी असे निर्देश देतो की, उक्त आरोपाबाबत तुमची न्यायचौकशी करण्यात यावी.

दिनांकः

## आरोपीची जबानी

प्रश्न १. तुम्हाला दोषारोप पत्राची नक्कल मिळाली काय?

उत्तर . होय.

प्रश्न२. तुम्हाला दोषारोप पत्रातील मजकुर वाचुन समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय?

उत्तर. होय.

प्रश्न३. तुम्हाला सरकारतर्फे वकील पाहिजे काय?

उत्तर. नाही.

प्रश्न४. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर. होय.

-----------------
**आरोपीची सही.**

**( श्री के. एन.मराठे )**
प्रथम श्रेणी न्यायादंडाधिकारी
कोर्ट न. १ नागपूर.

दिनांकः 10/3/26.

**न्यायनिर्णय**

१. सदर आरोपीविरुध्द प्रस्तुत खटला हा कलम भारतीय न्याय संहीता कलम २८५ अंतर्गत दाखल करण्यात आला आहे.

२. सदर प्रकरणात आरोपी याने त्याच्या स्वईच्छीने गुन्हा कबुल केला आहे. सदर गुन्हयाची कबूली नंतरचे परिणाम या न्यायालयाने त्यास स्वतः समजावून सांगितले, परंतु ता स्वतःहून गुन्हा कबूलीच्या निर्णयास ठाम राहिल्यामुळे त्याची कबूली मान्य करण्यात आली. यावरुन मी असे निर्णय करीत आहे की आरोपी कलम भारतीय न्याय संहीता कलम २८५ अन्वये गुन्हा केला आहे.

३. आरोपीस शिक्षेबद्दल विचारणेत आले. त्याने सदरचा गुन्हा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला कमी दंड अगर शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली. सदर आरोपीचे कथन समाधानकारक असल्यामुळे व आरोपीचा हा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला विहित शिक्षेपेक्षा कमी शिक्षा देणे योग्य आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-आदेश-**

आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २७५ अन्वये कलम २८५ भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा केल्याने रु. 300/- (अक्षरी तीनशे रुपये ) दंडाची शिक्षा देणेत येत आहे, दंड न भरल्यास त्यास एक दिवसाची साध्या कैदेची शिक्षा देण्यात येत आहे.

Fine paid of Rs 300/- vide recp. No 74/26 dt. 10/3/26.
10/3/26.
A.S.

**( श्री के. एन.मराठे )**
प्रथम श्रेणी न्यायादंडाधिकारी
कोर्ट न. १ नागपुर

दिनांकः 10/3/26.